लोकमत

ने
.
ग
ड

# तळोजा कारागृहात कैद्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** तळोजा कारागृहात कैद्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याबाबत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने राज्याचे मुख्य सचिव, अतिरिक्त पोलिस महासंचालक, कारागृह विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक व तळोजा कारागृहाच्या अधीक्षकांना नोटीस बजावली आहे. संबंधितांनी आठ आठवड्यात यासंदर्भात स्थितीदर्शक अहवाल आयोगाला सादर करावा, असेही निर्देश देण्यात आले. आयोगासमोर या प्रकरणी २२ सप्टेंबरला सुनावणी होईल.

मानवी हक्क आयोगाचे सदस्य संजय कुमार, प्रबंधक विजय केदार, सहायक प्रबंधक नूतन भोसले व कोर्ट क्लार्क आर. एम. नांदेडकर यांच्या शिष्टमंडळाने तळोजा कारागृहाला भेट देत तेथील कैद्यांची बराक, किचन, रुग्णसेवा व्यवस्था याची पाहणी केली. तसेच कैद्यासोबत संवादही साधला. या भेटीवेळी कारागृहाचे अधीक्षक प्रमोद वाघ, अतिरिक्त अधीक्षक गोविंद राठोड, उपअधीक्षक जितेंद्र काळे, एम. एस. पवार, वरिष्ठ कारागृह अधिकारी राहुल झुटाले, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मनीष कुमार कोडवालीकर उपस्थित होते. या पाहणीनंतर आयोगाच्या अध्यक्षांना सादर केलेल्या अहवालात त्यांनी कैद्यांच्या मानवी हक्कांचे येथे उल्लंघन होत असल्याचे नमूद केले.

III